# मेट्रो गाड्यांच्या निर्मितीसाठी मोठा प्रतिसाद

विशेष प्रतिनिधी, मुंबई

**कुलाबा ते** सीप्झ या ३३.५ किमीच्या भुयारी मेट्रो-३ प्रकल्पातील मेट्रो गाड्यांच्या निर्मितीसाठी मागविण्यात आलेल्या पूर्व-पात्रता निविदा प्रक्रियेला देशातील तसेच परदेशातील कंपन्यांनी प्रतिसाद दिला आहे. यामध्ये कंपनीने आठ डब्यांच्या ३१ अत्याधुनिक गाड्यांची निर्मिती करणे अपेक्षित आहे. या प्रकल्पात ५७ टक्के गुंतवणूक केलेल्या 'जपान इंटरनॅशनल कॉर्पो. एजन्सी' (जिका)च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार मेट्रोच्या गाड्यांची निर्मिती करण्यासाठी पूर्व-पात्रता निविदा मागविण्यात आल्या होत्या. यात भारत, युरोप, जपान आणि चीन येथील कंपन्यांनी सहभाग घेतला आहे. गाड्यांच्या निर्मितीसाठी पुढे आलेल्या कंपन्यांमध्ये 'अल्स्टॉम ट्रान्सपोर्ट इं. लि. अँड इंडिया अँड अल्स्टॉम ट्रान्सपोर्ट एस. ए. फ्रान्स', 'सीएफ एस. ए., स्पेन', 'सीआरआरसी नानजिंग, सीआरआरसी चँगचुन आणि सीआरआरसी इंटरनॅशनल कॉर्पो. लि., चीन', 'हिताची लि., जपान', 'कावासाकी हेवी इंडस्ट्रीज जपान अँड भेल इंडिया', 'मित्सुबिशी कॉर्पो., जपान' या कंपन्यांनी सहभाग घेतला आहे. मुंबई मेट्रो रेल कॉर्पो. लि.ने मागविलेल्या निविदांना चांगला प्रतिसाद मिळाला आहे. या कंपन्यांनी जास्तीत जास्त प्रवाशांना वाहून नेण्याची क्षमता असलेल्या चालकरहित तंत्रज्ञान असलेल्या गाड्या विकसित करणे अपेक्षित असल्याचे 'एमएमआरसी'चे प्रकल्प संचालक व हंगामी व्यवस्थापकीय संचालक एस. के. गुप्ता यांनी सांगितले.